असा. क्र. ४ रजिस्टर्ड नं. टीईसीएच/४७-३०३/एमबीआय/२००३-०५

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण

प्राधिकृत प्रकाशन

मंगळवार, जानेवारी १०, २००६/पौष २०, शके १९२७

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

भाग चार-अ

महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

आदिवासी विकास विभाग

मंत्रालय विस्तार, मुंबई ४०० ०३२, दिनांक १० जानेवारी २००६.

अधिसूचना

भारताचे संविधान.

क्रमांक आस्था. १०९९/प्र. क्र. ८९/का. १५.—-भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३०९ च्या परंतुकान्वये प्रदान केलेल्या शक्तींचा वापर करून महाराष्ट्राचे राज्यपाल याद्वारे, महाराष्ट्र शासनाच्या आदिवासी विकास विभागाच्या अखत्यारितील आयुक्त, आदिवासी विकास यांच्या नियंत्रणाखालील वसतिगृहातील गृहपाल (पुरुष) गट-"ब", (अराजपत्रित), गृहपाल (स्त्री) गट-"ब" (अराजपत्रित) आणि आश्रमशाळा वसतिगृहातील अधीक्षक (पुरुष) व गट-"क"

[किंमत : रुपये ७.००]

अधीक्षक (स्त्री) गट-"क" पदाच्या सेवाभरती नियमात सुधारणा करणारे नियम, २००४ खालीलप्रमाणे करीत आहेत :—

जसे,—

१. या नियमांना आदिवासी विकास विभागाच्या अधिपत्याखालील आयुक्त, आदिवासी विकास यांच्या नियंत्रणाखालील वसतिगृहातील गृहपाल, (पुरुष) गट-"ब", (अराजपत्रित), गृहपाल (स्त्री) गट-"ब" (अराजपत्रित) आणि आश्रमशाळा वसतिगृहातील अधीक्षक (पुरुष) गट-"क" व अधीक्षक (स्त्री) गट-"क" पदांचे (सेवाप्रवेश) (सुधारणा) नियम, २००६ असे संबोधण्यात यावे.

२. शासनाच्या आदिवासी विकास विभागाच्या अखत्यारितील आयुक्त, आदिवासी विकास यांच्या नियंत्रणाखालील वसतिगृहातील गृहपाल, (पुरुष) गट-"ब", (अराजपत्रित), गृहपाल (स्त्री) गट-"ब" (अराजपत्रित) आणि आश्रमशाळा वसतिगृहातील अधीक्षक (पुरुष) गट-"क" व अधीक्षक (स्त्री) गट-"क" पदांचे (सेवाभरती) नियम, २००४ (यापुढे "मूळ नियम" असे संबोधण्यात आले आहे.) च्या नियम २ मधील खंड (ड) वगळण्यात येत असून अस्तित्वातील खंड (इ) (फ) (ग) (ह) ऐवजी पुनरांकित क्रमांक (ड) (इ) (फ) (ग) असे असतील.

३. मूळ नियमातील नियम ३ मधील अस्तित्वात असलेल्या खंड (ब) च्या ऐवजी खालीलप्रमाणे तरतूद करण्यात येत आहे :—

"(ब) (*i*) ज्यांचे वय ३३ पेक्षा अधिक नाही :

परंतु, अगोदरच शासनाच्या सेवेत कार्यरत असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत वयोमर्यादा ५ वर्षांनी शिथिलक्षम राहील.

(*ii*) जे समाजकार्य किंवा समाजकल्याण प्रशासन किंवा आदिवासी कल्याण किंवा आदिवासी कल्याण प्रशासन शाखेतील पदव्युत्तर पदवी धारण करतात ;

(*iii*) ज्यांना मराठी भाषेचे पर्याप्त ज्ञान आहे."

४. मूळ नियम ४ मधील खंड (ब) नंतर खालील तरतूद जोडण्यात येत आहे, जसे :—

"किंवा

(क) पुढील अटी पूर्ण करणाऱ्या उमेदवारांमधून नामनिर्देशनाने,—

(*i*) ज्यांचे वय ३३ पेक्षा अधिक नाही :

परंतु, अगोदरच शासनाच्या सेवेत कार्यरत असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत वयोमर्यादा ५ वर्षांनी शिथिलक्षम राहील.

(*ii*) जे समाजकार्य किंवा समाजकल्याण प्रशासन किंवा आदिवासी कल्याण किंवा आदिवासी कल्याण प्रशासन शाखेतील पदव्युत्तर पदवी धारण करतात ;

(*iii*) ज्यांना मराठी भाषेचे पर्याप्त ज्ञान आहे."

५. मूळ नियम ५ मधील अस्तित्वातील खंड (अ) ऐवजी खालीलप्रमाणे तरतूद करण्यात येत आहे :—

" (अ) (*i*) ज्यांचे वय ३३ पेक्षा अधिक नाही :

परंतु, अगोदरच शासनाच्या सेवेत कार्यरत असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत वयोमर्यादा ५ वर्षांनी शिथिलक्षम राहील.

(*ii*) जे समाजकार्य किंवा समाजकल्याण प्रशासन किंवा आदिवासी कल्याण किंवा आदिवासी कल्याण प्रशासन शाखेतील पदवी धारण करतात ;

(*iii*) ज्यांना मराठी भाषेचे पर्याप्त ज्ञान आहे. "

६. मूळ नियम ६ मधील अस्तित्वातील खंड (अ) ऐवजी खालीलप्रमाणे तरतूद करण्यात येत आहे :—

" (अ) (*i*) ज्यांचे वय ३३ पेक्षा अधिक नाही :

परंतु, अगोदरच शासनाच्या सेवेत कार्यरत असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत वयोमर्यादा ५ वर्षांनी शिथिलक्षम राहील.

(*ii*) जे समाजकार्य किंवा समाजकल्याण प्रशासन किंवा आदिवासी कल्याण किंवा आदिवासी कल्याण प्रशासन शाखेतील पदवी धारण करतात ;

(*iii*) ज्यांना मराठी भाषेचे पर्याप्त ज्ञान आहे. "

७. मूळ नियम ७ मधील, नियम ३ या शब्दानंतर " आणि ४ " समाविष्ट करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

कृ. मा. पवार,

शासनाचे सह सचिव.

TRIBAL DEVELOPMENT DEPARTMENT

Mantralaya Annexe, Mumbai 400 032, dated the 10th January 2006.

NOTIFICATION

CONSTITUTION OF INDIA.

No. EST.1099/C. R. 89/D-XV.—In exercise of the powers conferred by the proviso to Article 309 of the Constitution of India, the Governor of Maharashtra, is hereby pleased to make the following rules further to amend the Warden (Male), Group-" B " (Non-Gazetted) and Warden (Female) Group-" B " (Non-Gazetted) of Hostels and Superintendent (Male) Group-"C" and Superintendent (Female) Group-" C " of the Ashram School Hostels under the Commissionerate of Tribal Development Department of the Government of Maharashtra (Recruitment) Rules, 2004, namely :—

1. These Rules may be called the Warden (Male), Group-" B ", (Non-Gazetted); Warden (Female) Group-" B " (Non-Gazetted) of Hostels and Superintendent (Male) Group-" C " and Superintendent (Female) Group-" C " of the Ashram School Hostels under the Commissionerate of Tribal Development under the Tribal Development Department (Recruitment) (Amendment) Rules, 2006.

2. In Rule 2, of the Warden (Male), Group-" B " (Non-Gazetted) and Warden (Female) Group-" B " (Non-Gazetted) of Hostels and Superintendent (Male) Group-" C " and Superintendent (Female) Group-" C " of the Ashram School Hostels under the Commissionerate of Tribal Development Department of the Government of Maharashtra (Recruitment) Rules, 2004 (hereinafter referred to as " the principal rules "); clause (*g*) shall be deleted and existing clause (*h*) be renumbered as clause (*g*).

3. In Rule 3 of the principal rules for the existing clause (*b*), the following shall be substituted, namely :—

" (*b*) (*i*) are not more than 33 years of age :

Provided that, the age-limit may be relaxed by five years in respect of candidates who are already in Government service.

(*ii*) Possess a Post-graduate Degree in Social Work or Social Welfare Administration or Tribal Work or Tribal Welfare Administration ;

(*iii*) have adequate knowledge of Marathi."

4. In Rule 4 of the principal rules after clause (*b*) the following shall be added, namely :—

" *or*

(*c*) by nomination from amongst the candidates who ,—

(*i*) are not more than 33 years of age :

Provided that, the age-limit may be relaxed by five years in case of candidates who are already in Government service.

(*ii*) possess a Post-graduate degree in Social Work or Social Welfare Administration or Tribal Welfare or Tribal Welfare Administration ;

(*iii*) have adequate knowledge of Marathi."

5. In rule 5 of the principal rules for the existing clause (*a*) the following shall be substituted, namely :—

" (*a*) (*i*) are not more than 33 years of age :

Provided that, the age-limit may be relaxed by five years in respect of candidates who are already in Government service.

(*ii*) possess a Degree in Social Work or Social Welfare Administration or Tribal Welfare or Tribal Welfare Administration ;

(*iii*) have adequate knowledge of Marathi. "

6. In rule 6 of the principal rules for the existing clause (*a*) the following shall be substituted, namely :—

"(*a*) (*i*) are not more than 33 years of age :

Provided that, the age limit may be relaxed by five years in respect of candidates who are already in Government service.

(*ii*) possess a Degree in Social Work or Social Welfare Administration or Tribal Welfare or Tribal Welfare Administration ;

(*iii*) have adequate knowledge of Marathi. "

7. In rule 7 of the principal rules after the words " Appointment to the posts mentioned in rule 3 ", the word and figure " and 4 " shall be inserted.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

K. M. PAWAR,
Joint Secretary to Government.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई